MHAM020071752022

आर.एम.जे.सी. क्र. २३०६/२०२२
सुनिता +३ –वि– निरंक

## निशानी क्रं.०१ खालील आदेश
(घोषीत दिनांक २० डिसेंबर २०२२)

अर्जदार यांनी सदर अर्ज मयत **विनोद किसनराव मानकर** यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याकरीता केलेला आहे. थोडक्यात अर्जदारांचा तपशील येणे प्रमाणे आहे की, **विनोद किसनराव मानकर** यांचे अर्जदार क्र. १ पत्नी, अर्जदार क्र. २ व ३ मुली व अर्जदार क्र. ४ आई आहेत. मयत **विनोद किसनराव मानकर** यांचा मृत्यु दिनांक २६/०५/२०१० रोजी अमरावती येथे झाला. मयताचे वारसदार म्हणुन औपचारीक वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता त्यांनी प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे. सबब,अर्ज मंजुर करण्यात यावा.

२) अर्जदारांनी मयत **विनोद किसनराव मानकर** यांच्या मृत्युबाबत महानगर पालीका,अमरावती यांनी पारीत केलेल्या मृत्यु प्रमाणपत्राची प्रत **नि.क्र १०** वर दाखल केली आहे. अर्जदारांनी त्यांचा साक्षीदार म्हणुन अर्जदार क्र.१ सुनिता यांची साक्ष **नि.क्र. ०९** वर नोंदविली. अर्जदारांच्या आधार कार्डांच्या साक्षांकीत प्रती **नि.क्र.११ ते १४** प्रमाणे दाखल केल्या आहेत. अर्जदारांनी दिनांक १८/१०/२०२२ रोजीचे **"बातमीपत्र"** या वर्तमान पत्रामध्ये मयत **विनोद किसनराव मानकर** यांचे वारस असल्याबद्दलचा कोणाचा आक्षेप आल्यास तो नोंदविण्याबाबत सर्व लोकांना सुचीत केले आहे, परंतु आजपर्यंत कुणीही त्यावर आक्षेप नोंदविलेला नाही. सदरच्या जाहीर नोटीसला **नि.क्रं.१६** देण्यात आले तसेच त्याच्या पावतीला **नि.क्र. १५** देण्यात आले. तसेच मयत **विनोद किसनराव**

**मानकर** यांचे अर्जदार हे वारस असल्याबद्दल सायटेशन नोटीस काढण्यात आली. सदरहु सायटेशन नोटीस हि दिनांक १०/११/२०२२ रोजी महानगर पालीका अमरावती, जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती व न्यायालयाचे नोटीस बोर्डवर लावण्यात आली. परंतु आजपर्यंत त्यावर कुणीही आक्षेप नोंदविलेला नाही.

३) वरील बाबीवरुन हे स्पष्ट होते की, आजपर्यंत कुणीही अर्जदाराव्यतीरीक्त मयताचे वारस असल्याबाबत आपला हक्क नोंदवलेला नाही. त्याचप्रमाणे अर्जदारांनी त्यांचा दावा शपथेवर साक्ष नोंदवून सिध्द केलेला आहे. सबब, अर्जदार हे मयत **विनोद किसनराव मानकर** यांचे वारस आहेत हे स्वीकारणे योग्य व न्याय्य होईल. सबब, अर्ज मंजुर होण्यास पात्र आहे. सबब, आदेश खालीलप्रमाणे.

**आदेश**

१. अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. अर्जदार यांच्या नावे आवश्यक ती कोर्ट फी भरल्यानंतर औपचारीक वारस प्रमाणपत्र देण्यात यावे.

स्वा–

दिनांक : २०.१२.२०२२

(संभाजी सो. देशमुख)
५ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर.),
अमरावती.